# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0026 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/01/2026 21:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 13/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/01/2026
**Time From (वेळेपासून):** 16:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/01/2026 **Time (वेळ):** 20:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/01/2026 20:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** धुळे शहरातील नगर रचनामुल्यनिर्धारण कार्यालयात धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यशवंत विश्वानाथ बोरसे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कल्पेश धनलाल चौरे | | | 1. इंदिरानगर, स्वराज्य भवन मागे, पिंपळनेर, ता साक्री, जि धुळे, धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | किशोर भटा भोई | | | 1. प्लट नं 63,ग द माळी,हौसिंग सोसा देवपुर,धुळे,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 3 | दिपक आनंदा हटकर | | | 1. प्लट नं 8,लोकरे नगर,शासकिय दुध डेअरी रोड, धुळे,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रूपये दराच्या 60अचलनी नोटा | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यापासुन कार्यरत आहोत. दि.13.01.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार महेंद्र गोकुळ पाटील यांची धुळे नगर रचना कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास आदेशित केल्याने आम्ही मा. उप विभागीय अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्र. 42, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री आदित्य गिरीष रौंदळ, कनिष्ठ अभियंता व श्री प्रभाकर विलास पाटील, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार महेंद्र लोटन पाटील व सापळा पथकाची ओळख करुन दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव महेंद्र गोकुळ पाटील, वय 35 वर्ष, व्यवसाय-शेती व माजी सैनिक, रा. चिमठाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढील प्रमाणे "माझे वडील श्री. गोकुळ हनुमंत पाटील यांचे नावे मौजे दलवाडे प्र.सो. ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे गट नं. 133/2, क्षेत्र 85 आर अशी शेत जमीन असुन सदर शेत जमीनी पैकी 10,000 चौ.मी. क्षेत्राचा ले आऊट नियोजित औद्योगिक प्रयोजनार्थ बिनशेती मंजुर होणेकरीता माझ्या वडीलांचे नावे दि.31.10.2025 रोजी जागेचा ले आऊट व आवश्यक त्या कागदपत्रांसह धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन अर्ज करुन त्याचे मुळ कागदपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात जमा केले होते.
त्यानंतर मी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात जावुन संबधित महसुल सहायक हटकर यांची भेट घेवुन त्यांना आमचे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझा ले-आऊट औद्योगिक प्रयोजनासाठी बिन शेती मंजुरी करीता नगर रचना कार्यालय, धुळे येथे पाठविला असल्याचे सांगितले. त्यावरुन मी धुळे नगर रचना कार्यालयात जावुन संबंधित सहायक आरेखक भोई यांची भेट घेवुन त्यांना माझे ले-आऊट मंजुरीच्या कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी मला ले-आऊट मंजुर करुन देण्यासाठी स्वत: करीता व सहायक नगर रचनाकार चौरे यांचेकरीता असे 50,000/- रुपये लाचेची मागणी केली होती व त्यापैकी त्यांनी माझ्याकडुन 10,000/- रुपये ऑनलाईन घेवुन उर्वरीत रक्कम ले-आऊट मंजुर झाल्यावर दयावे लागतील असे सांगितले होते. सदर कामाची मी शासकीय फी भरणा केलेली आहे. त्यानंतर मी दि.1201.2026 रोजी नगर रचना कार्यालयात सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे यांची भेट घेतली असता त्यांनी माझा ले-आऊट मंजुर करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला असल्याचे सांगुन त्यांनी काम

करुन दिलेबददल सहायक आरेखक भोई सांगतील त्याप्रमाणे त्यांचेकडे त्यांचे पैसे देण्यास सांगितले आहे. त्याच दिवशी नगर रचना कार्यालयाचे सहायक आरेखक भोई यांनी मला फोन करुन ''तुमचे ले-आऊट मंजुरीचे काम करुन दिले असुन बाकी राहिलेले माझे व चौरे साहेबांचे 40,000/- रुपये आणुन दया. नाहीतर मी तुमचे पुढील सिमांकित ले आऊट मंजुरीचे काम करुन देणार नाही.'' असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी लाच मागणीच्या दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे, सहायक आरेखक किशोर भोई व यांची भेट घेवुन  पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन धुळे शहरातील जुन्या महानगरपालिका आवारातील धुळे नगर रचना कार्यालयात सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे व सहायक आरेखक किशोर भोई यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पंच नं. 01 आदित्य रौंदळ यांना तक्रारदार यांच्या कार क्र. डीएल 04 सीबीबी 2276 ने तक्रारदार व पंच नं. 01 यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 यांना विचारणा केली असता त्यांनी ''मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या कारने धुळे नगर रचना कार्यालयात गेलो. तेथे तक्रारदार यांनी चौरे यांच्याबाबत विचारणा केली. तेव्हा तेथे हजर असलेल्या एका व्यक्तीने ते इलेक्शन डयुटीला गेले असल्याचे सांगितल्यावर तक्रारदार यांनी सहायक आरेखक किशोर भोई यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. त्या दरम्यान सहायक नगर रचनाकार चौरे यांचा भोई यांच्या मोबाईलवर फोन आला. त्यानंतर भोई यांनी माझयाकडे पैसे देवुन दया असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन चौरे यांना फोन केला, तेव्हा चौरे यांनी फोनवर तक्रारदार यांना मी भोई यांना सांगितले आहे असे सांगितले. त्यानंतर भोई यांनी तक्रारदार यांच्याकडे चौरे यांचेकरीता 30,000/- रुपये व त्यांचे स्वत: करीता 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी 30 जास्त होतात असे सांगितले. त्यानंतर भोई यांनी 30,000/- रुपये चौरे सरांना देवुन टाका असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी फोन करुन त्यांना देवुन देतो असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी मोबाईलवर स्पिकर सुरु करुन चौरे साहेबांना व्हॉटसएॅप कॉल केला. तेव्हा चौरे यांनी भोई यांच्याकडेच पैसे देण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी भोई यांच्याजवळ पैसे देईल'' असे सांगितल्याची हकिगत कथन केली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील  महसुल सहायक हटकर यांची भेट घेण्यास तक्रारदार व पंच नं. 1 यांना पाठवुन पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना हटकर यांची भेट घेण्यास रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 हटकर यांची भेट घेवुन परत आल्यावर पंच नं. 1 यांना विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे सह हटकर यांची संतोषी माता चौकात चहाच्या दुकानावर भेट घेतली असता हटकर यांनी तुमच्या इच्छेप्रमाणे योग्य वाटेल तेवढे द्या असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी चौरे यांचे पण 30,000 द्यायचे आहेत, तुम्हाला 10,000/- रुपये देतो असे हटकर यांना सांगितले, तेव्हा हटकर यांनी चालेल काही टेंशन नाही असे सांगुन लाच मागणी केल्याची हकिगत सांगितली. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर आज दि.21.01.2026 रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन त्यांना दि. 20.01.2026 रोजी नगर रचना कार्यालयाचे सहायक आरेखक भोई यांचा फोन येवुन भोई यांनी तक्रारदार यांना त्यांचे स्वत:चे त्यांना ऑनलाईन पैसे मिळालेले असुन आता फक्त चौरे साहेबांचे 30,000/- रुपये त्यांच्याकडेस देवुन टाका असे सांगितल्याने आम्ही पंच आदित्य गिरीष रौंदळ, कनिष्ठ अभियंता व प्रभाकर विलास पाटील, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे सापळा कारवाईकामी पैसे नसल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात उपलब्ध असलेल्या अचलनीय नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 30,000/- रुपयांच्या 500/- रुपये दराच्या 60 अचलनीय नोटा काढुन सदर अचलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 अशांना तक्रारदार यांच्या कारने धुळे नगर रचना कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 प्रभाकर पाटील, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला यांचेसह खाजगी वाहन क्रमांक एम.एच.01 डीपी 1478 ने जावुन धुळे शहरातील जुनी महानगरपालिका कार्यालयाच्या आवारा बाहेर वाहन थांबवुन धुळे नगर रचना कार्यालयाच्या परिसरात सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा त्यांनी समोरच खुर्चीवर बसलेले सहायक नगर रचनाकार चौरे यांनी तक्रारदार यांचेशी त्यांच्या कामाबाबत चर्चा करुन तुमच्या हिशोबाने करुन घ्या म्हटलं होतो असे म्हणुन तक्रारदार यांना पैशांबाबत हाताने

इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम बाहेर काढुन चौरे यांच्या समोर धरली असता चौरे यांनी त्यांच्या डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या डाव्या हातात धरुन ठेवली, तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना मोजुन घ्या असे सांगुन ठरवुन दिलेला इशारा केला.

तेव्हा सापळा पथक घटनास्थळी पोहोचल्यावर आमचे सुचनेवरुन पंच नं. 2 प्रभाकर पाटील यांनी सहायक नगर रचनाकार चौरे यांच्या हातातील लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले व पोकॉ मकरंद पाटील सहायक आरेखक किशोर भटा भोई यांना ताब्यात घेतले. पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे व पोकॉ. प्रविण पाटील यांनी महसुल सहायक दिपक आनंदा हटकर यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेवुन धुळे ला. प्र.वि. कार्यालयात आणले. त्यानंतर आज रोजी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार महेंद्र लोटन पाटील यांच्या वडीलांच्या शेतजमिनीचे ले-आउट मंजुर करण्यासाठी दि. 13.01.2026 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान धुळे नगर रचना व मुल्यनिर्धारण कार्यालयातील किशोर भटा भोई, सहायक आरेखक यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत:साठी 10,000/- रुपये व कल्पेश धनलाल चौरे, सहायक नगर रचनाकार यांच्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा कल्पेश चौरे, सहायक नगर रचनाकार यांनी मोबाईलवर तक्रारदार यांना सदर लाचेची रक्कम देण्यास सांगितले. तसेच धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सहायक दिपक आनंदा हटकर यांनी बिन शेती आदेश काढुन देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडुन 10,000 /- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर आज दि.21.01.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान सहायक नगर रचनाकार कल्पेश धनलाल चौरे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन धुळे नगर रचना कार्यालयात 14:58 वाजता 30,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dipak dagadu patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमंलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन